स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील शहरांच्या "हागणदारी मुक्त शहर" या दर्जामध्ये सातत्य राखण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: स्वमअ-२०१८/प्र. क्र. २०८/नवि-३४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मंत्रालय, मुंबई
दिनांक: २६ एप्रिल, २०१८.

पहा :

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दि. १५ मे, २०१५.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१६/प्र.क्र.२३/नवि-३४, दि. २८ मार्च, २०१६.
३) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.३१/नवि-३४, दि. १७ मार्च, २०१७.
४) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र.७३/नवि-३४, दि. १ सप्टेंबर, २०१७.

परिपत्रक:

संपूर्ण भारत देश ऑक्टोबर, २०१९ पर्यंत स्वच्छ करण्याच्या उद्देशाने दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून "स्वच्छ भारत अभियान" देश भरात राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी संदर्भाधीन दिनांक १५ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संपूर्ण राज्यात "मिशन मोड" पध्दतीने सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरे **"हागणदारी मुक्त"** करणे व घनकचरा व्यवस्थानातंर्गत **"स्वच्छ"** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु होऊन सुमारे ३ वर्षे होत आली आहेत. त्यामुळे राज्यातील नागरी भाग स्वच्छ व आरोग्यदायी करण्यासाठी प्रयत्न गतिमान करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्याचा नागरी भाग दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आला आहे. आता "हागणदारी मुक्त शहर" या दर्जामध्ये प्रत्येक शहरांने सातत्य राखणे आवश्यक आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन, राज्यात विभागीय स्तरावर कार्यशाळांचे आयोजन करून अभियानाच्या अंमलबजावणीचा सर्वंकष आढावा एप्रिल, २०१८ मध्ये घेण्यात आला.

३. सदर कार्यशाळांमध्ये असे आढळून आले आहे की, राज्यातील काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां क्षेत्रामध्ये अजूनही वैयक्तिक घरगुती शौचालयांचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहेत. तसेच, काही शहरांमध्ये लाभार्थ्यांना वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी निधीचा पहिला हप्ता वितरीत करण्यात आला आहे. परंतु, त्यांनी वैयक्तिक घरगुती शौचालयांचे बांधकामास सुरुवात केलेली नाही. अशा **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ३० मे, २०१८ पर्यंत सर्व वैयक्तिक घरगुती शौचालयांचे बांधकामे पूर्ण करावीत व त्याचे** gio-tagging **छायाचित्रे केंद्र शासनाच्या वेब पोर्टलवर अपलोड करावीत. तसेच, वैयक्तिक घरगुती शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांचे आधार अद्ययावतीकरण** (Aadhar Updation) **करण्याचे काम तात्काळ हाती घेऊन सदर काम ३० मे,**

२०१८ पर्यंत पूर्ण करण्यात यावे. सदर कालमर्यादेचे पालन करणे, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिवार्य राहील.

४. **राज्यातील शहरांच्या "हागणदारी मुक्त शहर" हा दर्जा शाश्वतरित्या टिकविण्याकरिता, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची उत्तम रित्या देखभाल करणे अनिवार्य आहे. या शौचालयांमध्ये वीज व पाण्याची उपलब्धतता तसेच दरवाजे, शौचकुपे व्यवस्थीत असणे आवश्यक आहे. त्यानुसार सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमध्ये सदर देखभाल व दुरुस्ती करण्याची खबरदारी घेण्यात यावी.**

५. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील शहरांनी हागणदारी मुक्तीचा दर्जा कायम राखण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच ODF+ व ODF++ हा दर्जा प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

६. **स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्याचा नागरी भाग दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी हागणदारी मुक्त घोषित केल्यानंतर OD Watch ठेवला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. राज्यातील शहरांच्या "हागणदारी मुक्त शहर" हा दर्जा शाश्वतरित्या टिकविणे ही प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. त्यामुळे, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचित करण्यात येते की, पुढील ३ महिन्यासाठी दररोज OD Watch कार्यक्रमाची पुनःश्च अंमलबजावणी करण्यात यावी.**

७. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था हागणदारी मुक्त घोषित केल्यानंतर सदर शहरांनी ODF+ व ODF++ हा दर्जा प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार, शहरातील वैयक्तिक घरगुती शौचालय, सामुदायिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांचे सेप्टिक टँक व्हॅक्युम एम्टीअर यंत्राव्दारे ठराविक कालावधीनंतर स्वच्छ करणे, त्यातील साचलेला मैला काढणे व त्या मैल्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

८. राज्यातील हागणदारी मुक्त घोषित केलेल्या शहरांचा दर्जा कायम राखण्याकरिता उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. याकरिता शहरातील वैयक्तिक घरगुती शौचालयांच्या, सामुदायिक शौचालयांच्या तसेच सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टिक टँक ची संख्या, त्यांचा आकार, त्यांचा वापर करणारी कुटुंबे इत्यादी बाबी विचारात घेऊन शहरातील या सर्व सेप्टिक टँक मधील मैला व्हॅक्युम एम्टीअर यंत्राव्दारे काढून शहराजवळ उपलब्ध एसटीपी (Sewage Treatment Plant) मध्ये प्रक्रीया करण्यात यावी. ज्या शहरांजवळ एसटीपी उपलब्ध नाही त्या शहरांनी अशा मैल्यावर शास्त्रोक्त प्रक्रीया करणे आवश्यक राहील. अशा प्रकारे शास्त्रोक्त प्रक्रीया करण्या करिता तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक असल्यास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) संचालनालया व सीईपीटी या संस्थे मार्फत देण्यात येईल.

९. **स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत हागणदारी मुक्त झालेल्या शहरांना त्या अनुषंगाने मिळालेले प्रोत्साहन अनुदान शासनाने दिनांक २८ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केलेल्या कामांसाठीच**

वापरण्यात यावे. या कामांव्यतिरिक्त अनुज्ञेय नसलेल्या इतर कामांसाठी सदर प्रोत्साहन अनुदानाचा वापर केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

१०. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४२६११२९१८१६२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar
Dnyandeo
Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2a1564be91cbedd893aaab701c944da0950abced08fbfefaaa118c3884344a4f, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2018.04.26 11:32:55 +05'30'

(सुधाकर ज्ञा. बोबडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा .मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
४. मा .राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
८. जिल्हाधिकारी, सर्व
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१२. निवडनस्ती, नवि-३४.